REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# ''संवेदनशील स्व–अभिव्यक्तीच्या चौकटीतले लेखन.''




सुभाष हरिभाऊ महाजन
पी.एच.डी. विद्यार्थी, शिक्षणशास्त्र,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

## • प्रस्तावना :

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाद्वारे शिक्षणक्षेत्रातील गुणवत्तावाढीची दिशा प्राप्त झाली आहे. गुणवत्तावाढीच्या दिशेने वाटचाल करताना प्रत्येक संस्था स्वतःची वेगळी वाट तयार करत आहे. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था–पनवेल, जि. रायगड येथील प्रगत शैक्षणिक चाचण्याच्या विश्लेषणातून असे लक्षात आले की, विद्यार्थी स्व–अभिव्यक्ती क्षेत्रातील लेखनप्रकार–उदा.निबंधलेखन, कथालेखन, विषयाधारित लेखन यामध्ये मागे आहेत. जिल्हयाची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, टिकविणे व जोपासणे हे संस्थेचे ध्येय असल्यामुळे भाषा विषयांतर्गत 'संवेदनशील स्व–अभिव्यक्तीच्या चौकटीतले लेखन' हा प्रयोग राबविण्याचे निश्चित केले. यासाठी प्रायोगिक तत्वावर एक 100 टक्के प्रगत केंद्र व एक अप्रगत केंद्र निवडून तेथे हा प्रयोग करण्यात आला.

## • प्रयोगाची उद्दिष्टे :

1. स्व–अभिव्यक्ती क्षेत्रातील लेखनात विद्यार्थी मागे का राहतात ह्याची कारणे शोधणे.
2. लेखनासंबंधीची संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी नाविन्यपूर्ण कृतींची रचना करणे.
3. नाविन्यपूर्ण कृतींद्वारे लेखनात होणारे बदल नोंदविणे.

## • प्रयोगाची व्याप्ती व मर्यादा :

**व्याप्ती** : प्रस्तुत प्रयोग सर्व प्राथमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

### मर्यादा :

1. प्रस्तुत प्रयोग रायगड जिल्हयातील 15 तालुक्यातील 237 केंद्रांपैकी फक्त दोन केंद्रात राबविण्यात आला आहे.
2. 100 टक्के प्रगत असणारे कर्जत तालुक्यातील एक केंद्र वाकस व प्रगत नसणारे एक केंद्र दहिवली नीड येथेच राबविण्यात आला आहे.
3. वरील केंद्रातील इयत्ता 5 वी ते 7 वी तील जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी हा प्रयोग राबविला आहे.
4. सन 2017–18 हया शैक्षणिक वर्षातील नोव्हेंबर व डिसेंबर 2017 हया कालावधीत हा प्रयोग राबविला आहे.

## • केंद्रनिवडीचा उद्देश :

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय 22 जून 2015 नुसार सर्व शाळा प्रगत करणेसाठी शासकीय, प्रशासकीय व पर्यवेक्षीय यंत्रणा विविध प्रकारे प्रयत्न करत आहे. त्यानुसार काही शाळासमूह (केंद्र) 100 टक्के प्रगत आहेत; तर काही अजूनही अप्रगत आहेत.

प्रस्तुत नाविन्यपूर्ण प्रयोगाचे प्रगत व अप्रगत केंद्रातील विद्यार्थ्यां संदर्भातील निष्कर्ष मिळवण्याच्या हेतूने एक प्रगत व एक अप्रगत केंद्र निवडले आहे.

- **प्रयोगाचे नियोजन व कार्यवाही :**

सर्वप्रथम केंद्र वाकस व केंद्र दहिवली नीड येथील इयत्ता 5वी ते 7 वी ला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांची कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांवर नाविन्यपूर्ण कृतीसंबंधीचा 'नमुना पाठ' घेण्यात आला. नाविन्यपूर्ण कृती घेण्यापूर्वीचे विद्यार्थ्यांचे स्व–लेखन व त्यांनतरचे स्वलेखन यांची तुलना करून शिक्षकांसमोर त्याचे विश्लेशण करण्यात आले. प्रत्यक्ष नमुना पाठातून विद्यार्थ्यांच्या लेखनात दिसून येणारा फरक पाहून शिक्षकांमध्ये कृतीसंबंधी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली. स्व–लेखनासाठी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण कृती वर्गात घेताना लागणारा कालावधी निश्चित करून त्याबाबतचे नियोजन पुढीलप्रमाणे केले.

**नियोजन**

| अ.क्र. | निबंधाचे विषय | लागणारे साहित्य / चित्र | मूल्यमापन | संभाव्य कार्यवाही नियोजन |
|---|---|---|---|---|
| 1 | आई | झाड, नदी, कुकर, चिमणीचे घरटे संगणक | विद्यार्थ्यांचे सर्जनात्मक लेखन तपासून विद्यार्थ्यांची तोंडी अभिव्यक्ति याद्वारे मूल्यमापन करणे. | कृतीकार्यक्रमांतर्गत कृतींसाठी प्रत्येकी एक निबंधलेखनातील 6 कृती पूर्ण होण्यासाठी 18 तासिकाप्रमाणे 5 विषयांसाठी 90 तासिका घेऊन नाविन्यपूर्ण प्रयोगाचे नियोजन केले |
| 2 | शेतावरील मजूर | सुर्य, जहाज, कुकर, मेंढी, हातमाग | | |
| 3 | संध्याकाळ | रंगीबेरंगी ढग, बाजार, पिंजरा, पिकलेले फळ | | |
| 4 | फुलपाखरू | फुलदाणी, फ्रॉक, ढग, लोहाराचा भाता, पंखा | | |
| 5 | बाजार | पक्ष्यांनी गजबजलेले झाड, रंगीबेरंगी ढग, घरटे मशीन | | |

एक आठवड्यासाठी एक विषय निवडून त्यासंबंधीच्या निश्चित केलेल्या चार कृती घेण्यासंबंधी मार्गदर्शन शिक्षकांना करण्यात आले. त्यानुसार नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यापूर्वीचे विद्यार्थ्यांचे स्व–लेखन व नंतरचे स्व–लेखन यातील फरकांच्या नोंदी ठेवण्यासंबंधी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.


दोन महिन्याच्या कालावधीत उपरोक्त केंद्रातील शाळांना भेटी देऊन शिक्षक व विद्यार्थी मुलाखती घेतल्या विद्यार्थ्यांना विषय देऊन लेखन करून घेतले व विद्यार्थ्यांनी केलेले लेखन तपासून अभिव्यक्तीसंदर्भात त्यांच्यामध्ये झालेल्या बदलांच्या नोंदी घेतल्या त्या पुढीलप्रमाणे :

- **प्रयोग राबविण्यापूर्वीचे निबंधलेखन व प्रयोग राबविल्यानंतरचे निबंधलेखन यामध्ये आढळलेले प्रमुख फरक**

| प्रयोग राबविण्यापूर्वीचे | प्रयोग राबविल्यानंतर |
|---|---|
| माहितीवजा लेखनावर भर | विषयाधारित आशयाधिष्ठित लेखनावर भर |
| साधी विधाने | अलंकारिक वाक्यरचना |
| केवळ वर्णनात्मक लेखन | तुलनात्मक व संवेदनशील लेखन |
| वैविध्याचा अभाव | वैविध्यपूर्ण वाक्यरचना |

## कृतीकार्यक्रमांतर्गत घेतलेली कृती/उपक्रम


### उपक्रम 1. विद्यार्थ्यांचे स्वप्रयत्नाने निबंधलेखन




### उपक्रम 2. साम्य शोधा तुलना करा. चित्रांच्या सहाय्याने.

| 1. | निबंधाचे विषय | आई | शेतावरचा मजूर | संध्याकाळ | फुलपाखरू | बजार |
|---|---|---|---|---|---|---|
| 2. | दाखवलेली चित्रे | झाड<br>घरटे<br>नदी<br>कुकर<br>हातमाग | सूर्य<br>चाबूक<br>मेंढी<br>कुकर<br>हातमाग | रंगीबेरंगी<br>ढग<br>बाजार<br>पिकलेली<br>फळे<br>पिंजरा | फुलदाणी<br>फ्रॉक<br>ढग<br>लोहाराचा<br>भाता<br>पंखा | पक्ष्यांनी<br>गजबजलेले<br>झाड<br>रंगीबेरंगी<br>ढग<br>घरटे<br>शिलाई<br>मशीन |

प्रयोगांतर्गत घेतल्या गेलेल्या कृतींमुळे विद्यार्थ्यांच्या स्व–अभिव्यक्तीत झालेल्या बदलांची नोंद घेणारी निबंधातील विधाने पुढीलप्रमाणे आहेत :




### उपक्रम 2 :– साम्य शोधा, चित्रांच्या सहाय्याने तुलना करा.

### विद्यार्थ्यांनी चित्रांच्या सहाय्याने तुलना करून तयार केलेली काही वाक्य उदाहरणादाखल :–


1. कुकरमध्ये कोंडलेल्या वाफेमुळे जसा स्फोट होतो. तसेच सहनशील आईच्या रागाचाही कधी कधी उद्रेक होतो.
2. बैलाच्या पाठीवर पडणारे चाबकाचे वळ आणि मजुराच्या मनाला डसणारे अपशब्दांचे वार दोन्हीही सारखेच नाही का?

3. विणकराने हातमागावर दोऱ्याने विणलेले वस्त्र आणि मजुरांने धारांनी शेतात वाढवलेले हिरवे पिक दोघांच्या कलाकृती त्यांच्या कष्टाची साक्ष देतात.
4. संध्याकाळी घराकडे परतणारी माणसे पाहिली की असे वाटते जसे रस्त्यावर रंगीबेरंगी ढगच तरंगत आहेत.
5. सकाळी कार्यालयाच्या पिंजऱ्यात कोंडलेले जीव संध्याकाळीच मुक्त होतात जणू!
6. फुलपाखरू ताईच्या फ्रॉकवरील हे नक्षीसारखेच खूप सुंदर होते.
7. फुलपाखराचे पंख लोहाराच्या भात्यासारखेच खाली वर होत होते.
8. गर्द झाडावर बसून कलकलाट करणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे बाजारातील गर्दीचा कलकलाट सुरू होता.
9. शिलाईमशीनच्या सुईखालून सुटलेल्या वस्त्राला जितका आनंद झाला असेल तितकाच आनंद बाजाराच्या गर्दीतून बाहेर पडल्यावर मला झाला.

## उपक्रम 3

## एकरूप व्हा. समरस व्हा.

माझ्या आजारपणात रात्रभार उशाशी बसून काळजी घेणाऱ्या
आईचा मोठा झाल्यावर मीही तशीच काळजी घेणार




एखाद्या गोष्टीचा आनंद झाला की मला फुलपाखरांसारखे उडावे असे वाटते.

संध्याकाळ ही थकत चाललेल्या माणसासारखी शांत निवांत भासते मला.


एखाद्या गोष्टीचा आनंद झाला की मला फुलपाखरांसारखे उडावे असे वाटते.

संध्याकाळ ही थकत चाललेल्या माणसासारखी शांत निवांत भासते मला.





## उपक्रम 4
## विरोधाभासी शब्द व त्यापासून वाक्य तयार करणे.




### प्रयोगाचे निष्कर्ष :

1. विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक, मुक्त प्रतिसादात्मक, उपयोजनात्मक प्रश्नांचा सराव/अध्ययन अनुभव दिला जात नाही. त्यामुळे स्व–अभिव्यक्ती क्षेत्रात मागे राहतात.
2. विद्यार्थ्यांना संवदेनशील विचार करण्यास उपयुक्त ठरणारे प्रसंग, घटना यांची निर्मिती करण्यात शिक्षक कमी पडतात.
3. साम्य शोधून तुलना करणे, भावनांशी समरस होणे, लेखनाच्या संधी देणे, विरोधाभाशी शब्दांपासून वाक्ये तयार करणे यासारख्या नाविन्यपूर्ण कृतींमुळे विद्यार्थ्यांच्या निबंधलेखनात विविधता निर्माण करता येते.

### • निवडलेल्या केंद्राचे प्रयोगानंतरचे निष्कर्ष :

1. प्रगत केंद्र – विद्यार्थ्यांच्या लेखनात वाक्यांची वैविध्यपूर्ण रचना दिसून आली.
2. अप्रगत केंद्र – विद्यार्थ्यांच्या वाक्यरचनेत, तोंडी स्व–अभिव्यक्तीत विविधता दिसून आली.

• **संदर्भ सूची :**
1. अकोलकर, ग.वि. आणि पाटणकर, ना.वि. (1996) मराठीचे अध्यापन (नविन आवृत्ती) पुणेः व्हीनस प्रकाशन
2. कुंडले,.म.बा. (1994) अध्यापन शास्त्र आणि पध्दती (सातवी आवृत्ती) पुणे : व्हीनस प्रकाशन
3. पाटील, लीला (1978) मराठीचे अध्यापन व मूल्यमापन पुणे : व्हीनस प्रकाशन



**सुभाष हरिभाऊ महाजन**
**पी.एच.डी. विद्यार्थी, शिक्षणशास्त्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.**